**BMM Level 1 Reading Passages**

# **आंबा**

मी आहे फळांचा राजा आंबा. माझा गोड वास लांबून ओळखता येतो. मी पिकलो की माझा रंग केशरी होतो. मुले आमरस आणि पोळी आवडीने खातात. कोकणात माझी खूप झाडे आहेत.

१. फळांचा राजा कोण आहे ?

२. आंबा कसा ओळखता येतो ?

३. मुले आवडीने काय खातात ?

४. आंब्याची झाडे कोठे खूप आहेत ?

५. आंब्यांचा रंग केशरी केव्हा होतो ?

# <u>सायकल</u>

मला सायकल खूप आवडते. बाबांनी मला सायकल शिकवली. सायकलीला दोन चाके असतात. चाकात हवा भरली की ती जोरात धावते. एकदा मी सायकल चालवताना पडलो. मला पायाला लागले. मी रडलो. तरी मी नंतर सायकल चालवली.

१ सायकलीला किती चाके असतात ?

२ सायकल मला कोणी शिकविली ?

३ एकदा सायकल चालवताना काय झाले ?

४ काय केले की सायकल जोरात धावते ?

५ सायकल वरून पडलो नंतर मी काय केले ?

# **कुत्रा**

आमच्या घरात एक कुत्रा आहे. त्याचे नाव लाडू. कारण तो सगळ्यांचा खूप लाडका आहे. त्याचा रंग पांढरा आहे आणि त्याच्या कपाळावर एक मोठा काळा ठिपका आहे. मी जेव्हा शाळेतून घरी येतो तेव्हा तो घराच्या दारात उभा असतो. मी घराच्या जवळ आलो की तो भुंकायला लागतो, मी दिसलो की माझ्या अंगावर उड्या मारतो. जेव्हा त्याला माझ्याजवळ खेळायचे असते तेव्हा तो माझा शर्ट धरून मला बाहेर घेऊन जातो. मग मी त्याच्याबरोबर चेंडू खेळतो. दूर फेकलेला चेंडू धावत जाऊन आणायला त्याला फार आवडते. रोज सकाळी मी त्याला फिरायला बाहेर घेऊन जातो.

१. लाडू कोणाचे नाव आहे ?

२. मी शाळेतून घरी येतो तेंव्हा लाडू कुठे असतो?

३. लाडूचा रंग कोणता ?

४. माझ्या बरोबर लाडूला खेळायचे असते तेंव्हा तो काय करतो?

५. मी आणि लाडू काय खेळतो ?

# <u>जेवण</u>

यश त्याच्या आजोबांबरोबर जेवायला बसला. आईने वांग्याची भाजी केली होती. शिवाय शेवयांची खीर आणि पुऱ्या होत्या. खीर-पुरी खाऊन यशचे पोट भरले आणि तो उठला. तरी त्याच्या ताटात काही पुऱ्या आणि थोडीशी खीर पण उरली होती. आई ओरडली, "यश, वांग्याची भाजी संपव आणि ताटात काही टाकायचं नाही."

यश म्हणाला, " मला नाही आवडत वांग्याची भाजी. आणि आता माझं पोट भरलं "

आजोबा म्हणाले, " यश, ताटात टाकू नये. कितीतरी लोकांना दोन वेळा जेवायला मिळत नाही " यशला लाज वाटली. तो म्हणाला, "आजोबा, मी यापुढे नेहमी ताट स्वच्छ करीन."

१. यश कोणाबरोबर जेवायला बसला ?

२. यशच पोट कसे भरलं ?

३. यशला काय आवडत नव्हते ?

४. यशला कशाची लाज वाटली ?

५. यशला लाज वाटली तेव्हा तो काय म्हणाला ?